# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## महाराष्ट्राच्या विकासात महा मेट्रोचा मोठा वाटा

## मेट्रो भवन येथे महाराष्ट्र दिवस समारोह संपन्न



महा मेट्रो ही संस्था महाराष्ट्र राज्याचे वास्तविक प्रतिनिधित्व मेट्रो रेल्वेच्या क्षेत्रामध्ये करत असून महाराष्ट्र राज्य हे नेहमीच देशामध्ये अग्रेसर राहले आहे. कौतुकास्पद आणि अभिमानस्पद बाब म्हणजे देशाच्या पायाभूत विकासामध्ये रेल्वे इन्फ्रास्ट्रचरचे जे योगदान आहे त्यामध्ये महा मेट्रो प्रामुख्याने प्रतिनिधित्व करत आहे असे गौरवपूर्ण उद्गार महा मेट्रोचे संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग व ऑपरेशन) श्री. अनिल कोकाटे यांनी व्यक्त केले. ते ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त मेट्रो भवन येथे आयोजित झेंडावंदनाच्या कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करतांना बोलत होते.

संपूर्ण देशात सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला हा आपला प्रदेश. एकूण "सकल देशांतर्गत उत्पादन" किंवा Gross Domestic Product चा विचार केला तर भारताच्या एकूण GDP पैकी सुमारे १३ % (12.92 %) वाटा राज्याचा आहे. एवढेच नव्हे तर राज्याचे "दरडोई उत्पन्न" किंवा Per Capita Income हे देशात सर्वात

जास्त आहे. औद्योगिक दृष्ट्या महाराष्ट्र आज प्रथम क्रमांकावर आहे.राज्याची चौफेर प्रगती होत असतानाच, महा मेट्रो नागपूर ने देखील गेल्या १० वर्षात मोठी मजल मारली आहे. महा मेट्रो नागपूर,पुणे आणि नवी मुंबई येथे यशस्वी रित्या मेट्रो रेल प्रकल्पाचे संचालन करत असून महा मेट्रोच्या टीमने व्यवस्थापकीय संचालक यांच्या नेतृत्वात निरंतर प्रगती समोर ठेवली आहे जे कि,महाराष्ट्रा राज्य आणि देशाच्या प्रगती मध्ये निश्चितच उच्चांक गाठेल असा विश्वास त्यांनी या दरम्यान व्यक्त केला

महा मेट्रो नवीन कीर्तिमान स्थापित करत पुढे जात असून महा मेट्रोने कमी वेळेत अनेक कार्य पूर्ण केले आहे. महा मेट्रोने कामगारांच्या भरवश्यावरच आज पर्यंत जलद गतीने निर्माण कार्य पूर्ण केले आहे या वेळी त्यांनी कामगार दिनाच्या देखील शुभेच्छा दिल्या.

.